आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२८ मार्च २०२५ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या रविवारी नागपूर दौऱ्यावर /माधव नेत्रालय प्रीमियम सेंटरचं भूमिपूजन आणि इतरही प्रकल्पांचं करणार उद्घाटन

- राज्यातल्या ६४ लाख लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात लवकरच पीकविमा नुकसानभरपाई जमा होणार

- चालू खरीप हंगामासाठी स्फुरद आणि पोटॅश खतांवरच्या अनुदानाच्या दरांना केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी / केंद्र सरकारी कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारकांना २ टक्के अतिरिक्त महागाई भत्ता देण्याचा निर्णय

**आणि**

- गतवर्षाचा सरस्वती सन्मान पुरस्कार प्रसिद्ध संस्कृत विद्वान महामहोपाध्याय साधु भद्रेशदास यांना जाहीर

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या ३० तारखेला महाराष्ट्र आणि छत्तीसगढला भेट देणार आहेत. नागपूरमध्ये गुढीपाडव्याच्या निमित्ताने ते स्मृतिमंदिर इथं राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक केशव बळीराम हेडगेवार यांना आदरांजली वाहतील. ते दीक्षाभूमीला भेट देतील. त्यानंतर ते  माधव नेत्रालय प्रीमियम सेंटरचं भूमिपूजन करतील आणि एका कार्यक्रमाला संबोधित करतील. याशिवाय इतरही प्रकल्पांचं उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर प्रधानमंत्री छत्तीसगढला जातील. बिलासपूर इथं ३३ हजार ७०० कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांची पायाभरणी आणि लोकार्पण त्यांच्या हस्ते होणार आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या ६४ लाख लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात लवकरच पीकविमा नुकसानभरपाई जमा होणार असल्याचं कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी सांगितलं आहे. शासनानं विमा कंपन्यांना द्यायचा २ हजार ८५२ कोटी रुपयांचा प्रलंबित हप्ता वितरित करायला मान्यता दिल्यामुळे आता लवकरच पात्र शेतकऱ्यांच्या आधारशी जोडलेल्या खात्यात पीकविमा नुकसान भरपाईची रक्कम थेट जमा होईल असं ते म्हणाले.

<><><><><>

'नमो शेतकरी महासन्मान निधी योजने'च्या सहाव्या हप्त्यांतर्गत उद्यापासून ९३ लाख २६ हजार शेतकरी कुटुंबांना लाभ वितरित केला जाणार आहे. सहाव्या हप्त्यात सुमारे २ हजार १६९ कोटी रुपये रक्कम पात्र लाभार्थ्यांच्या आधार आणि डीबीटी संलग्न सक्रीय बँक खात्यात जमा केली जाईल असं शासनाने कळवलं आहे.

<><><><><>

नाशिकमध्ये  त्र्यंबकेश्वर इथं २०२७ साली होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यात येणाऱ्या भाविकांची मोठी संख्या लक्षात घेऊन अनेक व्यवस्था नव्याने करण्यात येणार असल्याचं जलसंपदा, आपत्तीव्यवस्थापन आणि कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी आज सांगितलं. आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर महाजन यांनी आज त्र्यंबकेश्वर परिसराची पाहणी केली. त्यानंतर घेतलेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते.  कुशावर्ताप्रमाणेच त्र्यंबकेश्वरला नवं कुंड उभारून विविध घाटांचं विस्तारीकरण, स्वच्छता यासाठी सर्व उपाययोजना करण्यात येतील, अशी माहिती त्यांनी दिली.

<><><><><>

काँग्रेस पक्षात संघटनात्मक फेरबदलाचा भाग म्हणून पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांची जिल्हानिहाय निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.  प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन

सपकाळ यांच्या अहवालानंतर संघटनेत बदल होतील. या निरीक्षकांची बैठक आज सपकाळ यांच्या अध्यक्षतेखाली झाली. हे सर्व निरीक्षक त्यांना नेमून दिलेल्या जिल्ह्यांमध्ये जाऊन पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधून १५ दिवसांत प्रदेश काँग्रेसला अहवाल सादर करणार आहेत. त्यानंतर संघटनात्मक फेरबदलांच्या प्रक्रियेला सुरुवात होईल.

**<><><><>**

येत्या १ मे रोजी संयुक्त महाराष्ट्राचा ६५वा वर्धापन दिन असून या दिवसापासून संपूर्ण महिनाभर महाराष्ट्र महोत्सव साजरा करणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी दिली आहे. राष्ट्रवादीच्या राज्यभरातल्या पदाधिकाऱ्यांची बैठक आज मुंबईत झाली. त्यानंतर झालेल्या वार्ताहर परिषदेत सुनील तटकरे यांनी ही माहिती दिली.

**<><><><>**

उमेद अर्थात महाराष्ट्र राज्य ग्रामीण उपजीविका अभियानाशी निगडीत महिला बचत गटांनी उत्पादित केलेला शेवगा आज नवी मुंबईतून दुबईसाठी रवाना करण्यात आला. याविषयी उमेद अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश सागर यांनी आकाशवाणीला अधिक माहिती दिली.

**होल्ड बाईट - निलेश सागर**

**<><><><>**

इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी इलेक्ट्रॉनिक्स काँपोनंट उत्पादन योजनेला आज केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज नवी दिल्ली इथं मंत्रिमंडळ बैठकीनंतर वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली.

चालू खरीप हंगामासाठी स्फुरद आणि पोटॅश खतांवर अनुदानाच्या दरांनाही मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी मिळाली. त्यानुसार डीएपीचं ५० किलो वजनाचं पोतं शेतकऱ्यांना तेराशेपन्नास रुपयांना मिळेल.

केंद्रसरकारी कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारकांना २ टक्के अतिरिक्त महागाई भत्ता देण्याचा निर्णयही आजच्या बैठकीत झाला. त्यानुसार आता महागाई भत्ता ५३ टक्क्यावरुन ५५ टक्के होणार आहे. १ जानेवारी- २०२५ पासून ही वाढ लागू होणार आहे.

**<><><><><>**

लोकसभेने आज समुद्रमार्गे मालवाहतूक विधेयक २०२५ मंजूर केलं. हे विधेयक १९२५ साली केलेल्या समुद्रमार्गे मालवाहतूक कायद्याची जागा घेणार असून त्यात मालवाहू जहाज कंपन्यांचे हक्क आणि जबाबदाऱ्या नोंदवलेल्या आहेत. या कायद्यातल्या बिल ऑफ लेडिंग सहित इतर अनेक नियमांची अंमलबजावणी करण्याचे अधिकार केंद्र सरकारच्या अखत्यारीत दिले आहेत.

जुन्या कायद्यामध्ये कालानुरूप बदल घडवण्याचे काम या नव्या कायद्यामुळे होत आहे, असं केंद्रीय बंदरे, नौवहन आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी सांगितलं.

**<><><><><>**

२०२४ या वर्षाचा सरस्वती सन्मान पुरस्कार प्रसिद्ध संस्कृत विद्वान महामहोपाध्याय साधु भद्रेशदास यांना जाहीर झाला आहे. ‘स्वामी नारायण सिद्धांत सुधा’ या पुस्तकासाठी त्यांना हा पुरस्कार दिला जाणार आहे. मानपत्र, स्मृतीचिन्ह, १५ लाख रुपये असं या पुरस्काराचं स्वरुप आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश अर्जुन कुमार सिक्री यांच्या अध्यक्षतेखालील समितीनं पुरस्कार विजेत्याची निवड केली आहे. नांदेडमध्ये

१९६६ मध्ये जन्म झालेले भद्रेशदास हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे संस्कृत तज्ज्ञ आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या ३० तारखेला आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या मालिकेचा हा १२० वा भाग असेल.

**<><><><><>**

छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य करणारा प्रशांत कोरटकर याला आज कोल्हापूरच्या न्यायालयानं दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. २५ मार्चला त्याला अटक झाल्यानंतर न्यायालयानं त्याची रवानगी तीन दिवसांच्या पोलीस कोठडीत केली होती.

दरम्यान, आज सुनावणी संपल्यानंतर पोलीस कोरटकरला घेऊन जात असताना एका वकिलानं त्याच्यावर पादत्राणानं हल्ला करायचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी त्याला पकडलं.

**<><><><><>**

एटीएममधून दर महिन्याला ठराविक वेळा पैसे काढल्यानंतर आणखी पैसे काढण्यासाठी आकारल्या जाणाऱ्या शुल्कात १ मेपासून दोन रुपयांनी वाढ करायची परवानगी भारतीय रिझर्व्ह बँकेनं बँकांना दिली आहे. सध्या हे शुल्क प्रति व्यवहार २१ रुपये अशी आहे. बँका आता ती वाढवून २३ रुपयांपर्यंत नेऊ शकतात, असं रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेच्या वतीनं फिडे महिला ग्रां प्री बुद्धिबळ स्पर्धेचा पाचवा टप्पा पुण्यात १३ ते २४ एप्रिल या कालावधीत रंगणार आहे. जगातल्या आघाडीच्या बुद्धिबळपटू यात सहभागी होतील. जागतिक रॅपिड बुद्धिबळ विजेती

आणि ऑलिम्पियाडमध्ये सुवर्णपदक पटकावणारी ग्रँडमास्टर कोनेरू हंपी, ग्रँडमास्टर हरिका द्रोणावल्ली, ग्रँडमास्टर आर. वैशाली, दिव्या देशमुख यांच्यासह चीन, रशिया, पोलंड, बल्गेरिया, मंगोलिया, जॉर्जिया या देशांच्या बुद्धिबळपटू या स्पर्धेच्या मैदानात असतील.

या मालिकेतल्या सर्वोत्तम दोन बुद्धिबळपटू कँडिडेट स्पर्धेसाठी पात्र ठरणार असून पुढच्या वर्षीच्या जागतिक स्पर्धेसाठी चॅलेंजर निश्चित करण्यात ही स्पर्धा महत्त्वाची ठरणार आहे.

<><><><><>

गेल्या चोवीस तासात कोकणात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात किंचित घट झाली. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी, तर विदर्भात तुरळक ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित घट झाली आहे.

राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान ब्रम्हपुरी इथं ४२ पूर्णांक २ दशांश अंश सेल्सिअस, तर सर्वात कमी किमान तापमान पुणे इथं १८ पूर्णांक २ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात, कोकण आणि मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

//<><><><><>//